देशोन्नती

# डॉ. खत्री महाविद्यालयात शिक्षक दिन उत्साहात साजरा



**चंद्रपूर :** स्थानिक डॉ. खत्री महाविद्यालय, तुकूम चंद्रपुर येथे कनिष्ठ महाविद्यालयातील वर्ग ११ वी आणि १२ वी विज्ञान शाखेच्या विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाच्या सभागृहात शिक्षक दिन उत्साहात साजरा केला.

भारताचे माजी राष्ट्रपति आणि महान शिक्षणतज्ञ डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करूण कार्यक्रमाची सुरूवात करण्यात आली. कार्यक्रमाचेअध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जे. एम. काकडे होते. तर प्रमुख अतिथी म्हणून संस्थेच्या कोशाध्यक्षा प्रा. अनुश्री पाराशर, डॉ. टि. एम. शेख सोबतच विज्ञान शाखेचे सर्व प्राध्यापक मंचावर उपस्थित होते. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी शिक्षकांप्रती कृतज्ञता व्यक्तकेली. याप्रसंगी विद्यार्थ्यांनी शिक्षक दिनाचे महत्त्व, शिक्षकांचे विद्यार्थ्यांच्या जीवनातील योगदान आणि शिक्षणातुन व्यक्तीमत्व विकास याविषयी मनोगत व्यक्त केले.

Chandrapur Edition
Sep 11, 2026 Page No. 6
Powered by: erelego.com